# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 21 November 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक २१ नोव्हेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

विधानसभेची मतदान प्रक्रिया पूर्ण–राज्यात ६५ टक्क्यांहून अधिक मतदानाची नोंद

अंबाजोगाई तालुक्यात मतदान यंत्रांची तोडफोड–प्रशासनाच्या कारवाईनंतर मतदान प्रक्रिया सुरळीत–सर्व मतदान सुरक्षित असल्याचा निर्वाळा

बीड इथं अपक्ष उमेदवाराचा हृदयाघाताने मृत्यू तर परळीत मतदान केंद्र अधिकाऱ्याला हृदयविकाराचा झटका

मतदान गोपनीयता भंग प्रकरणी हिंगोली तसंच परभणीत दोन मतदारांविरोधात गुन्हा दाखल

५५ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव–इफ्फीला गोव्यात प्रारंभ

आणि

महिलांच्या आशियाई चषक अजिंक्यपद हॉकी स्पर्धेत चीनचा पराभव करून भारत अजिंक्य

****

राज्य विधानसभेच्या २८८ जागांसह नांदेड लोकसभेच्या पोटनिवडणुकीसाठीची मतदान प्रक्रिया काही अपवाद वगळता शांततेत पार पडली. राज्यभरातून निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या चार हजार १३६ उमेदवारांचं भवितव्य मतदान यंत्रात बंद झालं. आता येत्या शनिवारी २३ तारखेला होणाऱ्या मतमोजणीपर्यंत ही सर्व मतदान यंत्र सीलबंद अवस्थेत पूर्ण सुरक्षेत ठेवण्यात येणार आहेत. संध्याकाळी सहा वाजेपर्यंत राज्यभरात ६५ पूर्णांक ११ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली. कोल्हापूर जिल्ह्यात सर्वाधिक ७६ टक्के त्या खालोखाल गडचिरोलीत ७३ पूर्णांक ६८ टक्के तर मुंबई शहरात सर्वात कमी ५२ टक्के मतदानाची नोंद झाली.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सायंकाळी पाच वाजेपर्यंत ६८ पूर्णांक ८९ टक्के मतदान झालं. बीड जिल्ह्यात ६७ पूर्णांक ७९ टक्के, हिंगोली – ७१ पूर्णांक १० टक्के, जालना – ७२ पूर्णांक ३० टक्के, लातूर – ६६ पूर्णांक ९२ टक्के, नांदेड ६४ पूर्णांक ९२ टक्के, धाराशिव – ६४ पूर्णांक २७ टक्के, तर परभणी जिल्ह्यात ७० पूर्णांक ३८ टक्के मतदान झालं.

**नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी ६२ पूर्णांक ८९ टक्के मतदान नोंदवलं गेल्याचं वृत्त आहे.**

जालना आणि परभणीसह अनेक ठिकाणच्या मतदान केंद्रांवर सायंकाळी साडे पाच वाजेनंतरही मतदारांच्या मतदानासाठी लांबचलांब रांगा लावल्या होत्या. सहा वाजेपर्यंत मतदान केंद्र परिसरात हजर असलेल्या मतदारांना टोकन वाटप करून, सर्वांचं मतदान करून घेण्यात आलं.

****

बीड जिल्ह्याच्या अंबाजोगाई तालुक्यातल्या घाटनांदूर, चोथेवाडी, मुरंबी आणि जवळगाव आदी गावांमध्ये जमावानं लाठ्याकाठ्या आणि दगड घेऊन मतदान केंद्रांवर हल्ला केला. यावेळी व्हीव्हीपॅट मशीनसह मतदान यंत्रांची तोडफोड करण्यात आली. महायुतीचे उमेदवार धनंजय मुंडे यांनी या घटनेचा तीव्र निषेध केला असून, निवडणूक आयोगानं या घटनेचं संपूर्ण फुटेज तपासून तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

दरम्यान, या ठिकाणचं मतदान यंत्र बदलून मतदान प्रक्रिया सुरळीत झाल्याची तसंच सर्वांनी केलेलं मतदान सुरक्षित असल्याची माहिती बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिली..

> ***“परळी मतदारसंघातील मौजे घाटनांदूर तालुका अंबाजोगाई येथील मतदान केंद्रावर काही अज्ञात व्यक्तिंनी मतदान यंत्राला क्षती पोहचवण्याचा प्रयत्न केला. ही मतदान यंत्रे बदलून नव्याने मतदानाची कार्यवाही सुरू झाली. यापूर्वी मतदान यंत्रामध्ये ज्यांनी मतदान केलं आहे, त्यांची सर्व मते सुरक्षित आहेत.”***

****

परळी वैजनाथ इथल्या सरस्वती विद्यालयाच्या मतदान केंद्राचे केंद्राध्यक्ष जालिंदर जाधव यांना हृदयविकाराचा सौम्य झटका आला. रुग्णालयात झालेल्या प्राथमिक उपचारानंतर त्यांना घरी पाठवण्यात आल्याची माहिती निवडणूक विभागानं दिली.

**

बीड विधानसभा मतदारसंघातले अपक्ष उमेदवार बाळासाहेब नारायण शिंदे यांचं हृदयविकाराच्या धक्क्यानं निधन झालं. काल दुपारी मतदान प्रक्रिया सुरू असतांना, मतदान केंद्राबाहेर शिंदे यांना हृदयविकाराच्या धक्का आला, त्यात त्यांचं तत्काळ निधन झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात कन्नड तालुक्यातल्या रामनगर गावातल्या बहुतांश ग्रामस्थांनी पायाभूत सुविधांच्या अभावामुळे मतदानावर बहिष्कार घातल्याचं वृत्त आहे.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या परंडा शहरातल्या मतदान केंद्रावरच्या मतदान यंत्रात बिघाड झाल्यामुळे मतदान काही काळ बंद झालं होतं, मात्र यंत्रात दुरुस्ती केल्यावर मतदान प्रक्रिया सुरळीत झाली.

****

हिंगोली जिल्ह्यातल्या आखाडा बाळापूर इथल्या एका मतदान केंद्रात मोबाईलसह प्रवेश करून मतदान प्रक्रियेचं चित्रीकरण करून ते समाज माध्यमावर जाहीर करणाऱ्या एका तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतलं. संतोष शिवाजी आमले, असं या तरुणाचं नाव असून त्याच्यावर बाळापूर पोलिस स्थानकात आचारसंहिताभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

****

परभणी शहरातल्या शारदा महाविद्यालयाच्या मतदान केंद्रात शेख सुलेमान या व्यक्तीनं स्वतःचा मतदान करतानाचा फोटो समाजमाध्यमावर टाकल्यामुळे त्याच्याविरुद्ध गोपनीयतेचा भंग करण्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी मतदान सक्तीचं करणारा कायदा करण्याची गरज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केली आहे. काल मुंबईत मतदान केल्यानंतर ते बोलत होते. शहरी भागाच्या तुलनेत

गडचिरोली सारख्या दुर्गम भागात मतदान टक्केवारी वाढत असल्याकडे आठवले यांनी लक्ष वेधलं. प्रत्येक मतदान केंद्र हे पाचशे मतदार संख्या असणारं केंद्र असावं, जेणेकरून मतदानासाठी गर्दी होऊन मोठी रांग लागणार नाही, असं मत त्यांनी व्यक्त केलं. मतदान हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. जे मतदार मताधिकार वापरणार नाहीत, त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, असंही आठवले म्हणाले.

****

मतदारांचा उत्साह वाढवण्याच्या हेतूनं निवडणूक विभागानं राज्यभरात विविध ठिकाणी लक्षवेधक मतदान केंद्रं तयार केली होती. त्यात महिला विशेष, युवक विशेष, दिव्यांग विशेष, हरित अशा विविध प्रकारच्या मतदान केंद्रांचा समावेश होता. सर्व मतदान केंद्रांवर मूलभूत सुविधांसह दिव्यांग, ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष सुविधाही उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

शंभरी पार केलेले अनेक मतदार, तसंच दिव्यांग मतदारांनीही प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊन उत्स्फुर्तपणे मतदान केलं. छत्रपती संभाजीनगर इथंही महापालिकेअंतर्गत येणाऱ्या चार विधानसभा मतदान केंद्रांमध्ये सर्व सोयींनी सुसज्ज अशी, चार आदर्श मतदान केंद्रं उभारण्यात आली होती.

****

राज्यभरात मतदारांमध्ये मतदानाचा उत्साह दिसून आला. मूळ अंबाजोगाई इथले रहिवासी असलेले आणि सध्या युरोपात नॉर्वे इथं कार्यरत असलेले गणेश कोदरकर यांनी नॉर्वेहून चोवीस तासांचा प्रवास करत मतदानाला हजेरी लावली. आपला अनुभव त्यांनी आकाशवाणीशी बोलतांना या शब्दांत व्यक्त केला…

***“माझं नाव गणेश कोदरकर. आजच्या दिवशीच्या मतदानासाठी मी नार्वेवरून आलेलो आहे. नॉर्वे मध्ये मी काम करतो. आणि आजच्या दिवसासाठी खास अंबाजोगाईला माझ्या गावी येऊन मतदान केलंय. ही आवश्यक गोष्ट आहे. आणि प्रत्येकाने केली पाहिजे.”***

****

लातूर जिल्ह्यात अहमदपूर इथं रितेश कासनाडे आणि आदित्य पांचाळ या नवमतदारांनी काल पहिल्यांदा मतदान केलं, मतदान केंद्रावर पुरवण्यात आलेल्या सुविधांबाबत त्यांनी समाधान व्यक्त केलं.

****

हिंगोली जिल्ह्यातल्या आखाडा बाळापूर इथं ९५ वर्षांच्या दृष्टीहीन आजी शशिकला पंडितराव राऊत यांनी मतदान केंद्रावर प्रत्यक्ष येऊन मतदानाचा हक्क बजावला. १९६२ पासून आपण प्रत्येक निवडणुकीत मतदानाचं कर्तव्य पार पाडल्याचं या आजींनी सांगितलं. कळमनुरी विधानसभा मतदारसंघात मौजे हिवरा इथं विठ्ठल मुंडे या १०५ वर्षाच्या आजोबांनी प्रत्यक्ष मतदान केंद्रावर येत मतदानाचा हक्क बजावला. नांदेड इथं १०५ वर्षांच्या शशिकलाबाई पोशट्टी टिप्रेसवार या आजींनी मतदान केंद्रावर प्रत्यक्ष येऊन सहकुटुंब मतदानाचा हक्क बजावला.

जालन्यात तृतीयपंथीयांनी जैन विद्यालयातल्या मतदान केंद्रावर मतदानाचा अधिकार बजावल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

५५ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव – इफ्फीची काल गोव्यात ऑस्ट्रेलियन चित्रपट "बेटर मॅन" ने सुरुवात झाली. परंपरेनुसार गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते नारळाच्या रोपाला पाणी घालून या महोत्सवाचं उद्घाटन झालं. या उद्घाटन समारंभात भारतीय चित्रपटसृष्टीतले चार दिग्गज – राज कपूर, तपन सिन्हा, अक्किनेनी नागेश्वर राव आणि मोहम्मद रफी यांच्यावरील विशेष तिकिटाचं अनावरण करण्यात आलं. यावेळी प्रसार भारतीच्या वेव्स या ओटीटी प्लॅटफॉर्मचं अनावरण करण्यात आलं. या प्लॅटफॉर्मवर रामायण, महाभारत, शक्तिमान, हम लोग यासारख्या पूर्वी गाजलेल्या मालिका बघायला मिळणार आहेत. 'युवा चित्रपटनिर्माते' – हेच भविष्य आहेत" ही यंदाच्या या महोत्सवाची संकल्पना आहे.

****

बिहारमध्ये राजगीर इथं सुरु असलेल्या महिलांच्या आशियाई चषक अजिंक्यपद हॉकी स्पर्धेत भारतानं चीनचा पराभव करून अजिंक्यपद पटकावलं आहे. काल झालेल्या अंतिम सामन्यात मध्यंतरापर्यंत एकाही संघाला गोल करता आला नाही, मध्यंतरानंतर भारताच्या दीपिकाने एक गोल केला. हाच एकमेव गोल सामन्यात निर्णायक ठरला.

****

छत्रपती संभाजीनगर इथं आज शामराव बोधनकर स्मृती पुरस्कारांचं वितरण होणार आहे. यावेळी 'स्वातंत्र्यसैनिक शामराव बोधनकर स्मृती पुरस्कार' आणि 'समाजसेवी इंद्रायणी मधुकर बोधनकर स्मृती पुरस्कार', डॉ. रविंद्र कोल्हे आणि डॉ. स्मिता कोल्हे यांना प्रदान करण्यात येणार आहे. यावेळी 'अग्निशिखा कावेरी' या हैदराबाद

मुक्तिसंग्रामावर आधारित बालनाट्याचं उर्दू भाषांतर, आणि ‘हैदराबाद मुक्तिसंग्रामातील झुंजार महिला’ या डॉ. उर्मिला चाकुरकर यांच्या पुस्तकाचं प्रकाशन होणार आहे.

****